## स्वरलिपीचे प्रारंभिक ज्ञान - पं. भातखंडे पध्दती

१) **शुध्द स्वर :** कोणतीही खूण नाही. उदा. सा, रे, ग, म

२) **कोमल स्वर :** स्वराच्या खाली आडवी रेघ. उदा. रे॒, ग॒, ध॒, नि॒

३) **तीव्र स्वर :** स्वराच्या डोक्यावर उभी रेघ. उदा. म॑

४) **मध्य सप्तक :** कोणतीही खूण नाही. उदा. सा, रे, ग म

५) **मंद्र सप्तक :** स्वराखाली टिंब. उदा. नि़, ध़, प़

६) **तार सप्तक :** स्वरांच्या डोक्यावर टिंब. उदा. सां, रें, गं, मं

७) **स्वर लांबविणे :** स्वरापुढे आडवी रेघ. सा-, रे-, ग-

८) **कण स्वर :** ज्या स्वराचा कण घ्यावयाचा आहे, तो डोक्यावर लिहिणे. उदा. सा प ग

९) **मिंड :** एका स्वराहून दुसऱ्या स्वरावर येताना त्या दोहोत येणाऱ्या स्वरांना स्पर्श करणे म्हणजे 'मिंड' होय. मिंड दर्शविताना ( ⌒ ) या चिन्हाचा उपयोग केला जातो. उदा. सं प

१०) **सम :** x

११) **काल :** ०

१२) **अवग्रह :** शब्दासाठी ( ऽ ) व स्वरांसाठी ( - )

१३) **एक मात्रा :** मुळचा प्रत्येक बोल एका मात्रेचा, उदा. धा धिं धिं धा / सा रे ग म

१४) **अर्धी मात्रा :** दोन अक्षरांखाली ( ‿ ) अशी खूण उदा. धाधिं धिंधा / सारे गम



## अलंकार

१) आरोह : सा, रे, ग, म, प, ध, नि, सां ।
अवरोह : सां, नि, ध, प, म, ग, रे, सा ।

२) आरोह : सासा, रेरे, गग, मम, पप, धध, निनि, सांसां ।
अवरोह : सांसां, निनि, धध, पप, मम, गग, रेरे, सासा ।

३) आरोह : सारे, रेग, गम, मप, पध, धनि, निसां ।
अवरोह : सांनि, निध, धप, पम, मग, गरे, रेसा ।

४) आरोह : सा, सारे, सारेग, सारेगम, सारेगमप, सारेगमपध, सारेगमपधनि, सारेगमपधनिसां ।
अवरोह : सां, सांनि, सांनिध, सांनिधप, सांनिधपम, सांनिधपमग, सांनिधपमगरे, सांनिधपमगरेसा ।

५) आरोह : साग, रेम, गप, मध, पनि, धसां ।
अवरोह : सांध, निप, धम, पग, मरे, गसा ।

६) आरोह : सारेग, रेगम, गमप, मपध, पधनि, धनिसां ।
अवरोह : सांनिध, निधप, धपम, पमग, मगरे, गरेसा ।

७) आरोह : सारेगम, रेगमप, गमपध, मपधनि, पधनिसां ।
अवरोह : सांनिधप, निधपम, धपमग, पमगरे, मगरेसा ।

८) आरोह : सारेसारेग, रेगरेगम, गमगमप, मपमपध, पधपधनि, धनिधनिसां ।
अवरोह : सांनिसांनिध, निधनिधप, धपधपम, पमपमग, मगमगरे, गरेगरेसा ।

९) आरोह : सारेसागऽग, रेगरेमऽम, गमगपऽप, मपमधऽध, पधपनिऽनि, धनिधसांऽसां ।
अवरोह : सांनिसांधऽध, निधनिपऽप, धपधमऽम, पमपगऽग, मगमरेऽरे, गरेगसाऽसा ।

१०) आरोह : सारेगसारेगम, रेगमरेगमप, गमपगमपध, मपधमपधनि, पधनिपधनिसां ।
अवरोह : सांनिधसांनिधप, निधपनिधपम, धपमधपमग, पमगपमगरे, मगरेमगरेसा ।

११) आरोह : सागरेसा, रेमगरे, गपमग, मधपम, पनिधप, धसांनिध, निरेंसांनि, सांगंरेंसां ।
अवरोह : सांधनिसां, निपधनि, धमपध, पगमप, मरेगम, गसारेग, रेनि़सारे, साध़नि़सा ।

१२) आरोह : सारेसाग, रेगरेम, गमगप, मपमध, पधपनि, धनिधसां ।
अवरोह : सांनिसांध, निधनिप, धपधम, पमपग, मगमरे, गरेगसा ।

१३) आरोह : सारेगरेसा, रेगमगरे, गमपमग, मपधपम, पधनिधप, धनिसांनिध, निसांरेंसांनि, सांरेंगंरेंसां ।
अवरोह : सांनिधनिसां, निधपधनि, धपमपध, पमगमप, मगरेगम, गरेसारेग, रेसानि़सारे, सानि़ध़नि़सा ।



# ताल आधारित अलंकार अभ्यास

१) आरोह : सारेग सारेगम, रेगम रेगमप, गमप गमपध, मपध मपधनि, पधनि पधनिसां ।
अवरोह : सांनिध सांनिधप, निधप निधपम, धपम धपमग, पमग पमगरे, मगरे मगरेसा । **(ताल-रुपक)**

२) आरोह : सासारेगरेग, रेरेगमगम, गगमपमप, ममपधपध, पपधनिधनि, धधनिसांनिसां ।
अवरोह : सांसांनिधनिध, निनिधपधप, धधपमपम, पपमगमग, ममगरेगरे, गगरेसारेसा । **(ताल-दादरा)**

३) आरोह : सारेगसा, रेगमरे, गमपग, मपधम, पधनिप, धनिसांध, निसांरेंनि, सांरेंगंसां ।
अवरोह : सांनिधसां, निधपनि, धपमध,पमगप, मगरेम, गरेसाग, रेसानि़रे, सानि़ध़सा । **(ताल-केहरवा)**

४) आरोह : सारेसा, गरेसा, रेगरे मगरे, गमग पमग, मपम धपम, पधप निधप, धनिध सांनिध, निसांनि रेंसांनि, सांरेंसां गंरेंसां ।
अवरोह : सांनिसां धनिसां, निधनि पधनि, धपध मपध, पमप गमप, मगम रेगम, गरेग सारेग, रेसारे नि़सारे, सानि़सा ध़नि़सा । **(ताल-एकताल,दादरा,चौताल )**

५) आरोह : सारे गरेग, रेग मगम, गम पमप, मप धपध, पध निधनि, धनि सांनिसां ।
अवरोह : सांनि धनिध, निध पधप, धप मपम, पम गमग, मग रेगरे, गरे सारेसा ।
**(ताल-झपताल)**

६) आरोह : सारेसागरेगरेसा, रेगरेमगमगरे, गमगपमपमग, मपमधपधपम, पधपनिधनिधप, धनिधसांनिसांनिध, निसांनिरेंसांरेंसांनि, सांरेंसांगंरेंगंरेंसां ।
अवरोह : सांनिसांधनिधनिसां, निधनिपधपधनि, धपधमपमपध, पमपगमगमप, मगमरेगरेगम, गरेगसारेसारेग, रेसारेनि़सानि़सारे, सानि़साध़नि़ध़नि़सा । **(ताल-तिनताल)**

## राग - भीमपलास

भीमपलास हा राग 'काफी' थाटातून निर्माण होतो. या रागाच्या आरोहात रिषभ (रे) व धैवत (ध) हे दोन स्वर वर्ज्य असून अवरोह संपूर्ण आहे. म्हणून या रागाची जाती औडव-संपूर्ण होते. या रागात गांधार (ग) व निषाद (नि) हे दोन स्वर कोमल लागत असून, अन्य स्वर शुध्द लागतात.

भीमपलास रागाचा वादी स्वर मध्यम (म) असून संवादी स्वर षड्ज (सा) आहे. या रागात ख्याल, ध्रुपद, धमार व सुगम संगीतप्रकार गायले जातात. या रागाचा गान समय दिवसाचा तिसरा प्रहर आहे.

आरोह ⟶ नि॒ सा ग॒ म, प नि॒ सां |

अवरोह ⟶ सां नि॒ ध प, म प ग॒ म, ग॒ रे सा |

**स्वरविस्तार :**

सा, नि॒ सा ग॒ रे सा, ग॒ म प, म प ग म ग॒ रे सा |

**समप्रकृती राग :** बागेश्री.

**वैशिष्ट्ये :**

* या रागात निषादास (नि) षड्जाचा व गांधारास (ग) मध्यमाचा कणस्वरुपात प्रयोग केला जातो.
* या रागात सा म आणि प ग ही स्वरसंगती दृष्टीस पडते.
* वादी-संवादी, पूर्वांग-उत्तरांग याचा राग समयाशी असणारा संबंध यास हा राग अपवाद ठरतो.

**भीमपलास रागाधारित संगीतरचना :**

१) काटा रुते कुणाला (संगीतनाटक - हे बंध रेशमाचे, गायक - पं.जितेंद्र अभिषेकी)

२) स्वकुल तारक सुता, सुवरा (संगीतनाटक - स्वयंवर)

३) अमृताहुनी गोड नाम तुझे देवा (गायिका - माणिक वर्मा)

४) दशरथा घे हे पायसदान (गीतरामायण, गायक - सुधीर फडके)

५) तुला पाहते रे तुला पाहते (चित्रपट - जगाच्या पाठीवर, गायिका - आशा भोसले)

६) मधु मागसी माझ्या सख्या परी (गायिका - लता मंगेशकर)

७) नैनो में बदरा छाये (चित्रपट - मेरा साया, गायिका - लता मंगेशकर)

८) ये जिंदगी उसी की है (चित्रपट - अनारकली, गायिका - लता मंगेशकर)

## बंदीश — राग - भीमपलास — ताल - तिनताल

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्थायी | | | | | नि | - | प | ध | - | म | प | सां |
| | | | | | | | | खे | ऽ | लो | खे | ऽ | लो | नं | द |
| | | | | | | | | | | | | ३ | | | |
| नि | - | ध | प | म | प | ग | म | प | ग | - | म | ग | रे | सा | - |
| ला | ऽ | ला | ऽ | ह | म | सं | ग | हो | री | ऽ | रं | गि | ऽ | ली | ऽ |
| X | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
| नि | नि | सा | म | ग | रे | सा | - | म | ग | प | म | नि | प | नि | सां |
| ब्रि | ज | भ | व | न | न | की | ऽ | र | सि | ली | ऽ | स | खी | स | ब |
| X | | | | २ | | | | | | | | | | | |
| पनि | सारें | सां | रें | नि | ध | म | प | | | | | | | | |
| आऽ | ऽऽ | यी | ऽ | दे | ऽ | ख | न | | | | | | | | |
| X | | | | २ | | | | | | | | | | | |
| | | | अंतरा | | | | | प | - | प | प | म | प | ग | म |
| | | | | | | | | खैं | ऽ | च | खैं | ऽ | च | रं | ग |
| | | | | | | | | ० | | | | ३ | | | |
| प | नि | प | नि | सां | नि | सां | सां | नि | - | नि | सां | - | सां | नि | सां |
| छां | ऽ | ड | त | स | ब | प | र | रं | ऽ | ग | रं | ऽ | गी | स | खी |
| X | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |
| पनि | सारें | सां | रें | नि | ध | म | प | नि | नि | ध | प | म | प | गम | गम |
| रुऽ | ऽऽ | प | की | आ | ऽ | ग | र | अ | त | मा | ऽ | नि | नि | राऽ | ऽऽ |
| X | | | | २ | | | | | | | | | | | |
| पनि | पनि | सां | रें | नि | ध | म | प | | | | | | | | |
| धाऽ | ऽऽ | न | ट | ना | ऽ | ग | र | | | | | | | | |
| X | | | | २ | | | | | | | | | | | |

**स्थायी :**

खेलो खेलो नंदलाला हम संग।
होरी रंगिली ब्रिज भवनन की,
रसिली सखी सब आयी देखन॥

**अंतरा :**

खैंच खैंच रंग छांडत सब पर।
रंग रंगी सखी रुप की आगर,
अतमानिनी राधा नटनागर॥





## आलाप — राग - भीमपलास — ताल - तिनताल

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खेलो खेलो नंद | १) | म | प | ग | - | म | ग | रे | सा |
| | | X | | | | २ | | | |
| | २) | म | प | ग | - | साग | म | ग | रेसा |
| | | X | | | | २ | | | |
| खेलो खेलो नंदलाला हम संग | ३) | प | - | - | - | म | प | ग | - |
| | | ० | | | | ३ | | | |
| | | सा | ग | म | - | ग | - | रे | सा |
| | | X | | | | २ | | | |
| खैंच खैंच रंग | ४) | ग | म | प | नि | प | नि | सां | - |
| | | X | | | | २ | | | |
| खैंच खैंच रंग छांडत सब पर | ५) | प | नि | सां | - | गं | - | रें | सां |
| | | ० | | | | ३ | | | |
| | | नि | - | ध | प | मप | गम | पनि | सां |

### ताना

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| खेलो खेलो नंद | १) | निसा | गम | पग | -म | गम | पम | गरे | सा- |
| | | X | | | | २ | | | |
| | २) | निसा | गम | पनि | धप | मप | ग- | मग | रेसा |
| | | X | | | | २ | | | |
| खेलो खेलो नंदलाला हम संग | ३) | निसा | गग | साग | मम | गम | पप | मप | निनि |
| | | ० | | | | ३ | | | |
| | | पनि | सारें | सांनि | धप | मप | गम | पनि | सां- |
| | | X | | | | २ | | | |
| खैंच खैंच रंग | ४) | पनि | सांनि | धप | मप | गम | पनि | सां- | सां- |
| | | X | | | | २ | | | |
| खैंच खैंच रंग छांडत सब पर | ५) | पनि | सांमं | गंरें | सांनि | पनि | सारें | सांनि | धप |
| | | ० | | | | ३ | | | |
| | | मप | निध | पम | गम | गम | पनि | सां- | सां- |
| | | X | | | | २ | | | |

## ताल - तिनताल

**शास्त्रीय माहिती :**

१) मात्रा : १६ २) खंड : ०४ (४, ४, ४, ४ मात्रांचे)

३) टाळी : ०३ (१,५,१३ मात्रेवर) ४) काल : ०१ (९ मात्रेवर)

| मात्रा | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बोल | धा | धिं | धीं | धा | धा | धिं | धीं | धा | धा | तिं | तिं | ता | ता | धिं | धिं | धा |
| चिन्ह | x | | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |

**उपयोग :**

या तालाचा उपयोग छोटा ख्याल व सुगम संगीतासाठी केला जातो.

## ताल - एकताल

**शास्त्रीय माहिती :**

१) मात्रा : १२ २) खंड : ०६ (२, २ मात्रांचे)

३) टाळी : ०४ (१,५,९,११ मात्रेवर) ४) काल : ०२ (३, ७ मात्रेवर)

| मात्रा | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बोल | धीं | धीं | धागी | त्रक | तीं | ना | क | तीं | धागी | त्रक | धी | ना |
| चिन्ह | x | | ० | | २ | | ० | | ३ | | ४ | |

**उपयोग :**

या तालाचा उपयोग छोटा ख्याल व सुगम संगीतासाठी केला जातो.

## ताल - झपताल

**शास्त्रीय माहिती :**

१) मात्रा : १० २) खंड : ०४ (२, ३ मात्रांचे)

३) टाळी : ०३ (१, ३, ८ मात्रेवर) ४) काल : ०१ (६ मात्रेवर)

| मात्रा | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बोल | धि | ना | धि | धि | ना | ति | ना | धि | धि | ना |
| चिन्ह | x | | २ | | | ० | | ३ | | |

**उपयोग :**

या तालाचा उपयोग छोटा ख्याल व सुगम संगीतासाठी केला जातो.



## ताल - केहरवा

**शास्त्रीय माहिती :**

१) मात्रा : ०४ २) खंड : ०२ (२, २ मात्रांचे)

३) टाळी : ०१ (१ मात्रेवर) ४) काल : ०१ (३ मात्रेवर)

| मात्रा | १ | २ | ३ | ४ |
|---|---|---|---|---|
| बोल | धागे | नती | नक | धिन |
| चिन्ह | x | | ० | |

**उपयोग :**

या तालाचा उपयोग ठुमरी, चित्रपट गीते व सुगम संगीतासाठी होतो.

## ताल - दादरा

**शास्त्रीय माहिती :**

१) मात्रा : ०६ २) खंड : ०२ (३, ३ मात्रांचे)

३) टाळी : ०१ (१ मात्रेवर) ४) काल : ०१ (४ मात्रेवर)

| मात्रा | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|---|
| बोल | धा | धिं | ना | धा | तिं | ना |
| चिन्ह | x | | | ० | | |

**उपयोग :**

हा ताल सुगम संगीतातील भावगीत, भक्तिगीत या गीत प्रकारासोबत उपशास्त्रीय संगीतातील "दादरा" या गीतप्रकारासाठी उपयोगात आणला जातो.

## ताल - रुपक

**शास्त्रीय माहिती :**

१) मात्रा : ०७ २) खंड : ०३ (३, २, २ मात्रांचे)

३) टाळी : ०२ (४, ६ मात्रेवर) ४) काल : ०१ (१ मात्रेवर)

| मात्रा | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बोल | ति | ति | ना | धि | ना | धि | ना |
| चिन्ह | ० | | | १ | | २ | |

**उपयोग :**

या तालाचा उपयोग शास्त्रीय संगीतातील छोटा ख्याल व बडा ख्यालासाठी तसेच सुगम संगीतातील भावगीत, भक्तीगीत, चित्रपट इ. गीतप्रकारासाठी होतो.

## ताल - धुमाळी

**शास्त्रीय माहिती :**

१) मात्रा : ०८ २) खंड : ०२ (४, ४ मात्रांचे)

३) टाळी : ०१ (१ मात्रेवर) ४) काल : ०१ (५ मात्रेवर)

| मात्रा | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बोल | धा | धिं | धागी | त्रक | ता | तिं | ताकी | त्रक |
| चिन्ह | x | | | | ० | | | |

**उपयोग :**

या तालाचा उपयोग सुगम संगीतासाठी होतो.

## व्याख्या - ताल अंग

१) **सम :** तालाच्या पहिल्या मात्रेस 'सम' असे म्हणतात.

२) **काल :** ज्या मात्रेवर टाळी दिली जात नाही, जी मात्रा रिकामी दाखविली जाते, त्यास 'काल' असे म्हणतात.

३) **टाळी :** तालाचे स्वरुप प्रदर्शीत करण्यासाठी तालपध्दतीनुसार ज्या ठिकाणी 'टाळी' वाजविली जाते, त्या 'टाळी' असे म्हणतात.

३) **मात्रा :** संगीतातील गती दाखविताना जे ठोक हाताने दिले जातात, त्या दोन ठोक्यातील अवधीस 'मात्रा' असे म्हणतात.

४) **खंड :** तालातील विविध भागास 'खंड' असे म्हणतात.

५) **आवर्तन :** प्रत्येक तालाच्या पहिल्या मात्रेपासून शेवटच्या मात्रेपर्यंतच्या क्षेत्रास 'आवर्तन' असे म्हणतात.

६) **लय :** गायन, वादन किंवा नृत्य या तीन कलांसाठी काही विशिष्ट कालावधी लागतो. या कालमापनाच्या गतीस 'लय' असे म्हणतात. / दोन मात्रांमधील सारखे धावते अंतर म्हणजेच लय. लयीचे तीन प्रकार आहेत.

१) विलंबीत लय, २) मध्य लय, ३) द्रुत लय





## व्याख्या - राग अंग

१) **संगीत :** गायन, वादन व नृत्य या तीन कलांचा सुरेख संगम म्हणजे 'संगीत' होय.

२) **स्वर :** कायम उंचीच्या, अखंड टिकणाऱ्या व कानास मधुर लागणाऱ्या रंजक नादास 'स्वर असे म्हणतात'

१) **चल स्वर :** आपल्या नियोजित उंचीपेक्षा कमी अथवा अधिक होणाऱ्या स्वरास 'विकृत स्वर' असे म्हणतात. चल स्वरांचे दोन प्रकार आहेत.

अ) कोमल स्वर, ब) तीव्र स्वर

अ) **कोमल स्वर :** आपल्या नियोजित उंचीपेक्षा कमी लागणाऱ्या स्वरास 'कोमल स्वर' असे म्हणतात. 'रे, ग, ध व नि' हे चार स्वर कोमल लागतात. कोमल स्वर दर्शविण्यासाठी स्वराखाली आडवी रेघ ( रे ) चिन्ह स्वरुपात उपयोगात आणतात.

ब) **तीव्र स्वर :** आपल्या नियोजित उंचीपेक्षा अधिक लागणाऱ्या स्वरात 'तीव्र स्वर' असे म्हणतात. 'म' हा स्वर तीव्र लागतो. तीव्र स्वर दर्शविण्यासाठी स्वरांच्या वर उभी रेघ (म) चिन्ह स्वरुपात उपयोगात आणतात.

२) **अचल / शुध्द स्वर :** आपल्या नियोजित जागी लागणाऱ्या स्वरास 'शुध्द स्वर' असे म्हणतात.

३) **मेल अथवा थाट :** अशी स्वररचना की ज्यामधून रागांची निर्मिती होते. त्यास 'थाट' असे म्हणतात. उत्तर भारतीय संगीतात दहा (१०) थाट मानले जातात. १) कल्याण, २) बिलावल, ३) खमाज, ४) भैरव, ५) पूर्वी, ६) मारवा, ७) काफी, ८) आसावरी, ९) भैरवी, १०) तोडी.

४) **आरोह :** स्वरांचा चढता क्रम म्हणजे 'आरोह' होय.

सा रे ग म प ध नि सां

५) **अवरोह :** स्वरांचा उतरता क्रम म्हणजे 'अवरोह' होय.

सां नि ध प म ग रे सा

६) **वादी स्वर :** रागातील प्रमुख स्वरास 'वादी' स्वर असे म्हणतात. वादी स्वरास 'जीव स्वर, अंश स्वर, राजा स्वर' अशी विविध नावे संगीत ग्रंथातून मिळतात. या स्वराचे

प्रमाण राग गायनात अन्य स्वरांच्या तुलनेत अधिक असते.

७) **संवादी स्वर :** रागामध्ये वादी स्वराच्या खालोखाल महत्त्व असणारा दुसरा स्वर म्हणजे 'संवादी स्वर' होय.

८) **अनुवादी स्वर :** रागामध्ये वादी व संवादी हे महत्त्वाचे स्वर सोडून जे इतर स्वर असतात त्यांना 'अनुवादी किंवा सहचारी स्वर' असे म्हणतात.

उदा. भूप रागात 'सा रे ग प ध' या स्वरांपैकी 'ग' व 'ध' हे दोन स्वर क्रमशः 'वादी', 'संवादी' असून 'सा रे ध' हे अनुवादी स्वर आहेत.

९) **वर्ज्य स्वर :** रागाचे गायन करताना जे स्वर घेतले जात नाहीत, त्यास 'वर्ज्य' किंवा 'वर्जित स्वर' असे म्हणतात. उदा. भूप रागामध्ये 'म' व 'नि' हे दोन स्वर घेतले जात नाहीत. म्हणून ते भूप रागातील वर्ज्य स्वर होत.

१०) **सप्तक :** षड्ज ते निषाद पर्यंतच्या सात स्वरांना व त्यात षड्ज मिळविला की 'सप्तक' पूर्ण होते. सप्तकाचे तीन प्रकार पडतात.

१) मंद्र सप्तक :

२) मध्य सप्तक :

३) तार सप्तक :

१०) **जाती :** रागांमध्ये उपयोगात आणलेल्या स्वरसंख्येवरुन रागाची जाती निश्चित होते. त्याचे तीन प्रकार पडतात.

१) **औडव :** ज्या रागाच्या आरोह व अवरोहात स्वररचनेकरिता पाच स्वरांचा वापर केला जातो, त्यास 'औडव' जातीयुक्त राग असे म्हणतात.

२) **षाड्व :** ज्या रागाच्या आरोह व अवरोहात स्वररचनेकरिता सहा स्वरांचा वापर केला जातो, त्यास 'षाड्व' जातीयुक्त राग असे म्हणतात.

३) **संपूर्ण :** ज्या रागाच्या आरोह व अवरोहात स्वररचनेकरिता सातही स्वरांचा वापर केला जातो, त्यास 'संपूर्ण' जातीयुक्त राग असे म्हणतात.

रागातील आरोह आणि अवरोहातील स्वरसंख्येवरुन रागाची जाती निश्चित केली जाते. मुख्य जाती तीन, १) औडव, २) षाड्व, ३) संपूर्ण व आरोह-अवरोहातील



स्वरसंख्ये आधारे उपजाती खालीलप्रमाणे,

१) **औडव-औडव :** या प्रकारच्या रागामध्ये आरोहात पाच स्वर व अवरोहात पाच स्वरांचा उपयोग केला जातो.

२) **औडव-षाड्व :** या प्रकारच्या रागामध्ये आरोहात पाच स्वर व अवरोहात सहा स्वरांचा उपयोग केला जातो.

३) **औडव-संपूर्ण :** या प्रकारच्या रागामध्ये आरोहात पाच स्वर व अवरोहात सात स्वरांचा उपयोग केला जातो.

४) **षाड्व-औडव :** या प्रकारच्या रागामध्ये आरोहात सहा स्वर व अवरोहात पाच स्वरांचा उपयोग केला जातो.

५) **षाड्व-षाड्व :** या प्रकारच्या रागामध्ये आरोहात सहा स्वर व अवरोहात सहा स्वरांचा उपयोग केला जातो.

६) **षाड्व-संपूर्ण :** या प्रकारच्या रागामध्ये आरोहात सहा स्वर व अवरोहात सात स्वरांचा उपयोग केला जातो.

७) **संपूर्ण-औडव :** या प्रकारच्या रागामध्ये आरोहात सात स्वर व अवरोहात पाच स्वरांचा उपयोग केला जातो.

८) **संपूर्ण-षाड्व :** या प्रकारच्या रागामध्ये आरोहात सात स्वर व अवरोहात सहा स्वरांचा उपयोग केला जातो.

९) **संपूर्ण-संपूर्ण :** या प्रकारच्या रागामध्ये आरोहात सात स्वर व अवरोहात सात स्वरांचा उपयोग केला जातो.

११) **गानसमय :** राग नियमांचा विचार करुन संगीतज्ञांनी राग गायनाची निश्चित केलेली वेळ म्हणजे 'गानसमय' होय.

१२) **पकड :** रागाचे स्वरुप स्पष्ट करण्यासाठी रागामधील विशिष्ट स्वर समूह रागगायनात वारंवार घेतला जातो. त्यास रागाचे 'मुख्यांग' किंवा रागाची 'पकड' असे म्हणतात.